# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय,

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोननं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- ३०९** **दिनांक :- ०४/११/२०२१**

## गांज्याची विक्री करणाऱ्यास अटक करुन २ किलो ४३५ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त- पेल्हार पोलीस स्टेशन गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतील नालासोपारा फाटा, पेल्हार रोड येथील तुषार लॉजचे पाठीमागे दिनांक ०२/११/२०२१ रोजी दुपारी १५.०० वा. चे सुमारास एक इसम गांजा नावाचा अमली पदार्थ अवैधरित्या स्व:ताच्या कब्जात बाळगुन बेकायदेशीर विक्री करीता येणार असल्याची बातमी पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटिकरण कक्षास मिळाली होती. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी दोन पंचासह छापा कारवाई केली असता, आरोपीत नामे. रिजवान अब्दुल खान, वय-२४ वर्षे, रा. मायकल कंम्पाऊडचे मागे, नालासोपारा फाटा, पेल्हार रोड, नालासोपारा (पु.), ता.वसई, जि.पालघर, याचे कब्जात २५,०००/- रुपये किंमतीचा २ किलो ४३५ ग्रॅम वजनाचा गांजा नावाचा अंमली पदार्थ मिळुन आल्याने, तो जप्त करण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे गु. रजि. नं. ।। ११/२०२१, एन .डी. पी. एस. ॲक्ट- १९८५ चे कलम- ८(क), २०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक, (गुन्हे), पो.उप.नि/सनिल पाटील, पो.हवा. टी. जी. माने, पो.ना. टी. एस. चव्हाण, प्रताप पाचुंदे, पो.शि. संदिप शेळके, बी. एस. गायकवाड, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, मोहसिन दिवाण, यांनी केली आहे.

-------oooo------